# गणेशोत्सव - २०२४

## पुणे शहर वाहतुक नियोजन व बदल

| अ. क्र. | तपशिल | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | गणपती प्रतिष्ठापना व मुर्ती खरेदीनिमित्त करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था | दि. ०५/०९/२०२४ ते ०७/०९/२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते रात्री २४.०० पर्यत | दिनांक ०५/०९/२०२४ ते ०७/०९/२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते रात्री २४.०० पर्यत गणपती प्रतिष्ठापना व मुर्ती खरेदी निमित्त आवश्यकते प्रमाणे वाहतुकीत एकूण ०३ रस्त्यावर बदल करण्यात आलेले असून पर्यायी मार्ग व पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे. |
| २ | गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागात जड वाहनांचे वाहतूकीस बंदी बाबत | दि. ०५/०९/२०२४ रोजी पासून ते १८/०९/२०२४ | गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील एकुण १२ रस्त्यावर जड / अवजड वाहनांचे वाहतूकीस बंदी करण्यात आलेली आहे. |
| ३ | अथर्वशीर्ष पठणा निमित्त वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदल | दि. ०८/०९/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वाजे पासून ते अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपेपर्यंत | १.शिवाजी रोड :- जिजामाता चौक ते रामेश्वर मंदिर चौक<br>२.आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक<br>३.लक्ष्मीरोडवर विजय मारुती चौक/ सोन्या मारुती चौकापासून आवश्यकतेनुसार वाहतूक वळविली जाईल. |
| ४ | गणेशोत्सव कालावधीतील बंद रस्ते व पर्यायी मार्ग | दि.११/०९/२०२४ ते १८/०९/२०२४ पर्यत दररोज सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यत | गणेशोत्सव कालावधीमध्ये १६ रस्ते बंद करण्यात आले असून त्यांना पर्यायी मार्ग देण्यात आलेले आहेत. |
| ५ | गणेशोत्सव २०२४ कालावधीमध्ये तसेच गणेश विसर्जनाचे दिवशी उपलब्ध असणारे पार्किंगबाबत | दि. ०७/०९/२०२४ व १८/०९/२०२४ रोजी पर्यत श्री. गणेश विसर्जन मिरवणूक संपेपर्यत | गणेशोत्सव २०२४ कालावधीमध्ये तसेच गणेश विसर्जनाचे दिवशी एकूण २६ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. |
| ६ | गणेश विसर्जन मिरवणूकीचे वेळी वाहतूकीसाठी बंद रोड,डायव्हर्शन पॉईट रिंगरोड, नो-पार्कीगची ठिकाणे व पार्कीगची ठिकाणे | दि. १७/०९/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजेपासून श्री. गणेश विसर्जन मिरवणूक संपेपर्यत | गणेश विसर्जन मिरवणूकीचे वेळी वाहतूकीस १७ रस्ते बंद करण्यात आलेले असून १० ठिकाणी डायव्हर्शन पॉईंट देण्यात आलेले आहेत. तसेच वरील बंद रस्त्याकरीता पर्यायी मार्ग तयारकरण्यात आला असुन रिंग रोड चा वापर करावा.<br><br>मुख्य मिरवणूक असलेल्या एकूण १० रस्त्यावर दिनांक १७.०९.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून नो पार्किंग करण्यात आलेली आहे.<br><br>खंडोजीबाबा चौक ते हॉटेल वैशाली यांना जोडणाऱ्या उपरस्त्यांचे १०० मीटर परिसरात पार्किंग करीता बंदी करण्यात येत आहे. नमुद रस्त्यांवर असणारी पार्किंग व्यवस्था वरील कालावधीमध्ये स्थगित करण्यात येत आहे.<br><br>दिनांक १७/०९/२०२४ चे ००.०१ ते १८/०९/२०२४ चे २४.०० वा. पर्यत एकूण ४८ तासांकरीता संपूर्ण शहरामध्ये जड वाहनांस प्रवेश बंद करण्यात आला आहे.<br><br>गणेश विसर्जनादरम्यान धायरी फाटा, केशवनगर मुंढवा व ससाणे नगर, हडपसर परिसरातील वाहतूक बदल करण्यात आलेल असून पर्यायी मार्ग देण्यात आलेले आहेत. |

**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४ दिनांक :- / /२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**<u>गणपती प्रतिष्ठापना व मुर्ती खरेदीनिमित्त करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था-</u>**

दिनांक ०५/०९/२०२४ व ०७/०९/२०२४ रोजी श्री. गणेशाची प्रतिष्ठापना निमित्त गणेश भक्त व मंडळे सकाळी ०६.०० ते २४.०० वा.पर्यंत श्रींची मुर्ती खरेदी करीत असतात. गणेश मुर्ती विक्रीचे बहुसंख्य स्टॉल हे **डेंगळे पुल ते शिवाजी पुलाचे दरम्यान श्रमिक भवन समोर (आण्णाभाऊ साठे चौक) ,कसबापेठ पोलीस चौकी ते जिजामाता चौक ते मंडई ,सावरकर पुतळा ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड) तसेच कुंभारवाडा, केशवनगर मुंढवा येथे आहेत.**या परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए)(बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकते नुसार दिनांक **०५/०९/२०२४ ते ०७/०९/२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते रात्री २४.०० पर्यत आवश्यकतेप्रमाणे** वाहतुकीत खालीलप्रमाणे बदलाबाबतचे आदेश निर्गमित करित आहे.

**<u>अ) वाहतूक व्यवस्था :-</u>**

**१) <u>शिवाजी रोड</u>** :- गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे. वाहन चालकांनी खालील मार्गाचा अवलंब करावा.

**पर्यायी मार्ग** :- गाडगीळ पुतळा चौकातून डावीकडे वळण घेऊन

१. संताजी घोरपडे पथावरुन कुंभारवेस चौक, शाहीर अमर शेख चौक मार्गे इच्छितस्थळी जावे.

२. शिवाजीनगर कडून शिवाजी रोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी स.गो.बर्वे चौकातून डावीकडे वळन न घेता, सरळ जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक, टिळक चौक मार्गे इच्छितस्थळी जावे.

३. झाशी राणी चौक ते खुडे चौक ते डेंगळेपुल मार्गे कुंभारवेसकडे जाणा-या वाहन चालकांनी खुडे चौकामधून म.न.पा.पुणे समोरुन मंगला सिनेमा लेन मधुन कुंभारवेस**किंवा**प्रिमीयर गॅरेज चौक शिवाजीपुल मार्गे गाडगीळ पुतळा चौक डावीकडे वळन घेऊन कुंभारवेस चौक या मार्गाचा वापर करावा.

**२) <u>सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड) नो पार्कींग</u>**

गणपती विक्री दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूकडील वाहतूक सुरु राहील, परंतू नमुद टप्प्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाहने पार्क करु नये.

❖ आवश्यकतेप्रमाणे बॅरिकेडस् व दोरचा वापर करण्यात येईल.

**पार्किंग व्यवस्था :-**

१. मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा पर्यंत.

२. जमनालाल बजाज पुतळा ते पुरम चौक रस्त्याचे डाव्या बाजूस

३. निलायम ब्रिज ते सिंहगड रोड जंक्शन

**३) <u>केशवनगर, मुंढवा</u>**

दिनांक ०७.०९.२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते २४.०० वाजेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात आवश्यकतेप्रमाणे केशवनगर, मुंढवा येथे वाहतुकीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**एकेरी मार्ग :-**

**१)** छत्रपती शिवाजी महाराज चौक, केशवनगर येथून मांजरीकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी मांजरी रोडने न जाता गायरान वस्ती रोडने रेणुका माता मंदीर येथुनउजवीकडे वळून मांजरी रोडकडे जावे.

२) गायरान वस्ती येथून मुंढवा चौकाकडे येणाऱ्या वाहनचालकांनी रेणुका माता मंदिर येथून डावीकडे वळून पुढे व्यंकटेश ग्राफिक्स येथून उजवीकडे वळून मांजरी रोडवरून मुंढवा चौकाकडे जावे.

**ब)वाहतूक सुरु असलेले रस्ते :-**

खालील नमुद मार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनांकरीता **(जड वाहनांना प्रवेश बंदी)** एकेरी वाहतूक सुरु राहील.

१. फडके हौद चौक ते जिजामाता चौक ते फुटका बुरुज

२. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक ते मोती चौक

३. मंगला टॉकिज समोरील प्रिमीयर गॅरेज लेन मधूनकुंभारवेस

**क)पार्किंग व्यवस्था :-**

गणेश मुर्ती खरेदीसाठी येणारे भक्त/मंडळाची वाहने पार्किंगसाठी खालील प्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

१. न्या.रानडे पथावर कामगार पुतळा चौक ते शिवाजी पुतळा या दरम्यान रस्त्याचे कोर्टाकडील एका बाजूस.

२. वीर संताजी घोरपडे पथावर म.न.पा. बिलभरणा केंद्र ते गाडगीळ पुतळा चौक या रस्त्याचे दक्षिण बाजूस

३. टिळक पुल ते भिडे पुल दरम्यानचे नदीपात्रातील रस्त्यावर

४. मंडई येथील मिनर्व्हा व आर्यन पार्किंग तळावर

५. शाहू चौक (फडगेट चौकी चौक) ते राष्ट्रभुषण चौक :- फक्त रस्त्याचे डावे बाजुस

**ड )पी.एम.पी.एम.एल. बसेसच्या डायव्हर्शनबाबत :-**

१. शिवाजीनगर स्टॅण्डवरुन शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस हया स.गो.बर्वे चौकातून शिवाजीपुलावरुन जाण्याऐवजी स.गो.बर्वे चौकामधून जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळक रोडने स्वारगेटकडे जातील.

२. कार्पोरेशन बसस्टॉप येथून स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस ह्या झाशीराणी चौक मार्गे जंगली महाराजरोडने अलका टॉकीज चौक, टिळक रोड / शास्त्री रोडने स्वारगेटकडे जातील.

तरी वाहनचालकांनी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून वाहतुक सुरळीत ठेवण्यास वाहतुक पोलीसांना सहकार्य करावेअसे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत**:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४ दिनांक :- //२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**<u>गणेशोत्सव काळात पुणे शहरातील मध्यवर्ती भागात जड वाहनांचे वाहतूकीस बंदी बाबत</u>**

पुणे शहरात गणेश उत्सव काळात नागरिकांची साहीत्य खरेदी व देखावे पाहण्यासाठी मोठया प्रमाणावर गर्दी होते. त्यामुळे सुरक्षेची उपाययोजना म्हणून व रस्त्यांवरून धावणा-या जड/अवजड वाहनांमुळे नागरिकांना असुरक्षितता निर्माण होवून त्यांचे जिवीतास धोका होवू नये तसेच पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका, गणेशदेखावे वाहतूक करणारी वाहने इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**दिनांक ०५.०९.२०२४ रोजी पासून ते १८.०९.२०२४ पर्यत गणपती विसर्जना पर्यंत खालील नमुद रस्त्यांवर जड /अवजड वाहनांचे वाहतूकीस २४ तास बंदी करण्यात येत आहे.**

१) **शास्त्री रोड -** सेनादत्त चौकी चौक ते अलका चौक
२) **टिळक रोड -** जेधे चौक ते अलका चौक
३) **कुमठेकर रोड -** शनिपार ते अलका चौक
४) **लक्ष्मी रोड -** संत कबीर चौक ते अलका चौक
५) **केळकर रोड -** फुटका बुरुज ते अलका चौक
६) **बाजीराव रोड -** पुरम चौक ते गाडगीळ पुतळा
७) **शिवाजी रोड -** गाडगीळ पुतळा ते जेधे चौक
८) **कर्वे रोड -** नळस्टॉप चौक ते खंडोजीबाबा चौक
९) **फर्ग्युसन कॉलेज रोड -** खंडोजीबाबा चौक ते विर चाफेकर चौक
१०) **जंगली महाराज रोड -** स.गो.बर्वे चौक ते खंडोजीबाबा चौक
११) **सिंहगड रोड -** राजाराम ब्रिज ते सावरकर चौक
१२) **मुदलियार रोड/गणेश रोड-** पॉवरहाऊस-दारुवाला-जिजामाता चौक - फुटका बुरुज चौक

तरी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाडण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे शहर वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

<u>प्रत</u>:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/ /२०२४ दिनांक :- //२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**<u>अथर्वशीर्ष पठणानिमित्त वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलाबाबत..</u>**

दिनांक०८/०९/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वाजेपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या समोर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गपणती मंडळ यांच्या संयोजनाखाली अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम होत आहे त्या कार्यक्रमासाठी हजारो महिला भाविक सहभागी होत असतात त्याकरीता सदर कार्यक्रम दरम्यान वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी व वाहतूक सुरळीत सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मीअमोल झेंडे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक ०८/०९/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वाजे पासून ते अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपेपर्यंत वाहतुकीचे बदलाबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**अ) वाहतूक व्यवस्था :-**

❖ खालील नमूद रस्त्यांवर सर्व प्रकारची वाहने जाणे-येणेसाठी बंद करणेत येत आहे.

**१. शिवाजी रोड : जिजामाता चौक ते रामेश्वर मंदिर चौक**

**<u>पर्यायी मार्ग-</u>** गाडगीळ पुतळा-जिजामाताचौक डावीकडे वळून गणेश रोडने फडके हौदचौक,देवजीबाबा चौक उजवीकडे वळून हमजेखान चौक सरळ महाराणाप्रताप मार्गावरुन गोविंद हलवाई चौक उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक डवीकडे वळून शिवाजीरोडने स्वारगेटकडे

**२. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक**

**<u>पर्यायी मार्ग-</u>**अप्पा बळवंत चौक बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळा चौक उजवीकडे वळून जिजामाता चौक नंतर वरीलप्रमाणे.

❖ **लक्ष्मीरोडवर विजय मारुती चौक / सोन्या मारुती चौकापासून <u>आवश्यकतेनुसार वाहतूक वळविली जाईल</u>.**

**<u>पर्यायी मार्ग-</u>**सोन्यामारुती चौक डावीकडे वळुन मिर्जा गालीब रोड जंक्शन उजवीकडे वळुन मंडई डावीकडे वळून शिवाजी रोडने स्वारगेट

तरी वाहनचालकांनी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाडण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे शहर वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे. असे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**<u>प्रत</u>:-** १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४दिनांक :- //२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**गणेशोत्सव काळातील तात्पुरते वाहतुक बदलाबाबत...**

पुणे शहरात गणेश उत्सव काळात नागरिकांची मोठया प्रमाणावर गर्दी होते. त्यामुळे सुरक्षेची उपाययोजना म्हणून व रस्त्यांवरून धावणा-या वाहनांमुळे नागरिकांना असुरक्षितता निर्माण होवून त्यांचे जिवीतास धोका होवू नये तसेच पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**दिनांक ११.०९.२०२४ पासून ते १८.०९.२०२४** पर्यत तात्पुरते स्वरुपात गर्दीची परिस्थिती पाहुन **आवश्यकतेप्रमाणे** खालीलप्रमाणे वाहतूक व्यवस्थेत बदलहे सायंकाळी **१७.०० वा.** पासून ते गर्दी संपेपर्यत राहतील.

१. **सर्व प्रकारच्या वाहनांसाठी करण्यात आलेला वाहतूक व्यवस्थेतील बदल-**

शिवाजीनगरवरुन स्वारगेट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनी स.गो.बर्वे चौक-जे.एम.रोड-अलका चौक- टिळक रोड किंवा शास्त्री रोडचा वापर करावा किंवा सिमला चौक-कामगार पुतळा चौक- शाहीर अमर शेख चौक -बोल्हाई चौक मार्गे नेहरु रोडचा वापर करुन सेव्हन लव्हज चौक मार्गे स्वारगेटकडे जाणाऱ्या रस्त्याचा वापर करावा.गर्दीची परिस्थीती पाहून पीएमपीएमएल बसेस या वरीलप्रमाणे वळविण्यात येतील.

२.**चारचाकी वाहन चालकांना शिवाजीनगर येथून स्वारगेटला जाण्यासाठी** वरील मार्गाचा वापर करता येईल. चारचाकी वाहनांना गाडगीळ पुतळा ते शाहीर अमर चौक, मालधक्का चौक, बोल्हाई चौक, नरपतगिरी चौक व पुढे नेहरू रोडने स्वारगेटकडे जाता येईल. तसेच जिजामाता चौक ते फुटका बुरज येथून उजवीकडे वळून शनिवारवाड्या पासून नदीपात्रातील रस्त्याने (चंद्रशेखर आपटेरोड) भिडेपूल जंक्शनवरुन उजवीकडे वळून केळकर रोड झेड ब्रिज जंक्शन डावीकडे वळुन गरुड गणपती चौक उजवीकडे वळून अलका चौक मार्गे इच्छित स्थळी जाता येईल.

३.**आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौकाकडे** जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग-१)** बाजीरावरोड,केळकर रस्त्यावरील वाहनांनी अप्पा बळवंत चौक बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळाचौक उजवीकडे वळून जिजामाता चौक डावीकडे वळून गणेश रोडने फडके हौदचौक,देवजीबाबा चौक उजवीकडे वळून हमजेखान चौक सरळ महाराणाप्रताप मार्गावरुन गोविंद हलवाई चौक उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक डांवीकडे वळून शिवाजीरोडने स्वारगेटकडे

२) बाजीरावरोड,केळकर रस्त्यावरील वाहनांनी अप्पा बळवंत चौक बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळाचौक उजवीकडे वळून संताजी घोरपडे रोडने कुंभारवेस चौक मार्गे इच्छितस्थळी

४. **बेलबाग चौक ते रामेश्वर चौक**

**पर्यायी मार्ग** :- १)शिवाजीरोडवरील स्वारगेट कडे जाणारी मिनी पीएमपीएमएल बसेस तसेच इतर हलकी वाहने बेलबाग चौकातून सेवासदन मार्गे लक्ष्मी रोडने अलका टॉकीज चौक मार्गे टिळक/शास्त्री रोडने स्वारगेटकडे जातील.

२) शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणा-या पीएमपीएमएल बसेस ह्या स.गो.बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळकरोडने स्वारगेटकडे जातील.

३)शिवाजीरोडवरुन पुणे स्टेशन, हडपसर कडे जाणा-या बसेस गाडगीळ पुतळा - कुंभारवेस - शाहिरअमर शेख चौक, बोल्हाई चौक -नेहरु रोडने इच्छितस्थळी

४. <u>नो-पार्कींग बाबत</u>

शिवाजी रोडवर जिजामाता चौक ते बेलबाग चौक ते रामेश्वर चौक उजवीकडे वळून मंडई ते शनिपार चौक उजवीकडे सेवासदन चौक ते आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक, आप्पा बळवंत चौक ते फुटका बुरुज चौक व जिजामाता चौक ते फुटका बुरुज चौकया मार्गावर **सर्व प्रकारच्या वाहनांना पार्कींगसाठी मनाई राहील. तसेच आवश्यकता भासल्यास या मार्गांवर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशास मनाई राहील.**

गणेशोत्सवाचे काळात दिनांक ११/०९/२०२४ ते १६/०९/२०२४ या दरम्यान सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यंत कुमठेकर रस्ता, सदाशिवपेठ, फडके हौद रस्ता, सिंहगड गॅरेज ते म.न.पा. कार्यशाळा चौक (नाईक रस्ता) व कोहिनुर हॉटेल ते भगवान महावीर चौक, (एम.जी.रोड) या मार्गावरील एकेरी वाहतूकीचे आदेश गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपात शिथील केले जातील.

तरी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाडण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे शहर वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

<u>प्रत</u>:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४ दिनांक :- / /२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- गणेशोत्सव कालावधीतील बंद रस्ते व पर्यायी मार्ग**

सन २०२४ चा गणेशोत्सव दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीमध्ये साजरा होत असुन शहरात ठिक-ठिकाणी श्रींच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर मोठया प्रमाणात देखावे व रोषणाई करण्यात आलेली आहे. सदरची रोषणाई व देखावे पाहण्यासाठी शहरातील व शहराबाहेरील नागरीक मोठया प्रमाणात येतात. त्यामुळे रहदारीचा ताण वाढतो, वाहतूकीची काही प्रमाणात कोंडी तसेच वाहतुक संथ होते, ही कोंडी व गैरसोय टाळणेसाठी त्याचप्रमाणे नागरीकांना गणेशोत्सवाचा आनंद लुटता यावाव वाहतुक सुरक्षीत, सुरळीत राहणेकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मीअमोल झेंडे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुनखालील रस्त्यांवर **आवश्यकते प्रमाणेदिनांक ११/०९/२०२४ ते १८/०९/२०२४पर्यंत दररोज सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यंत आवश्यकतेनुसार** सर्व प्रकारच्या वाहतूकीस बंदी करण्यात येत आहेत.

| अ.नं. | वाहतूकीस बंद रस्ते | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | **लक्ष्मी रोड** : हमजेखान चौक ते टिळक चौक | १. डुल्या मारूती चौक उजवीकडे वळून दारूवाला पुल मार्गे इच्छितस्थळी<br>२.हमजेखान चौक डावीकडे वळून महाराणा प्रताप रोडने सरळ घोरपडी पेठ पोलीस चौकी पुढे शंकर शेठ रोडने इच्छित स्थळी जावे.<br>३.सोन्यामारुती चौक डावीकडे वळुन मिर्जा गालीब रोड जंक्शन (सरळ पानघंटी चौक सरळ सोलापूर रोडवरुनइच्छितस्थळी) |
| २. | **शिवाजी रोड** : गाडगीळ पुतळा ते जेधे चौक | १.शिवाजीनगरवरुन स्वारगेट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनी स.गो.बर्वे चौक-जे.एम.रोड-अलका चौक - टिळक रोड किंवा शास्त्री रोडचा वापर करावा किंवा सिमला चौक-कामगार पुतळा चौक- शाहीर अमर शेख चौक -बोल्हाई चौक मार्गे नेहरु रोडचा वापर करुन स्वारगेटकडे जाणाऱ्या रस्त्याचा वापर करावा.<br>२.कुंभारवेस चौक- पवळे चौक, साततोटी चौक, योजना हॉटेल उजवीकडे वळून देवजी बाबा चौक, हमजेखान चौक, महाराणा प्रताप रोड मार्गे घोरपडी पेठ पोलीस चौकी, घोरपडी पेठ उद्यान, झगडे आळी ते शंकर शेठ रोड.<br>३. वाहतुकीचे परिस्थितिनुसार दुचाकी वाहने ही गाडगीळ पुतळा, लालमहल पर्यंत सोडण्यात येतील तेथून दुचाकी वाहनचालकांनी डावीकडे वळण घेवून फडके हौद चौक मार्गे दारुवाला पुल मार्गे इच्छितस्थळी |
| ३. | **बाजीराव रोड** : पूरम चौक ते आप्पा बळवंत चौक | पूरम चौक, टिळक रोडने टिळक चौक उजवीकडे वळून केळकर रोडने आप्पा बळवंत चौक. |

टिप :- पूरम चौक ते गाडगीळ पुतळा दरम्यान जाणेसाठी करण्यात आलेली एकेरी वाहतूकीचे रस्त्यावर टेलिफोन भवन ते पूरम चौक या दरम्यानचे रस्त्यावर वरील नमूद कालावधीत तात्पुरता एकेरी वाहतूक आदेश शिथील करून दुहेरी

| | | |
|---|---|---|
| वाहतूक करण्यात येईल. | | |
| ५. | <u>**टिळक रोड**</u> : मराठा चेंबर्स ते हिराबाग चौक | जेधे चौक, नेहरू स्टेडीयम समोरील एकेरी मार्गाने जमनालाल बजाज पुतळा उजवीकडे वळून पूरम चौक व हिराबाग |

➢ टिप :- पी.एम.पी.एम.एल. व तीन आसनी रिक्षा खेरीज सर्व प्रकारच्या वाहनांना बंद.

| | | |
|---|---|---|
| ६. | **सिंहगड गॅरेज, घोरपडी पेठ ते राष्ट्रभूषण ते हिराबाग चौक** | सिंहगड गॅरेज चौकातून सरळ मन्साराम नाईक रस्त्याने डॉ.कोटनीस हॉस्पीटल शिवाजी रस्ता क्रॉस करून शिंदे आळीतून बाजीराव रस्ता क्रॉस करून भिकारदास चौकी चौक, खजीना विहीर चौकातुन वळून टिळक रोडने वाहन चालकांनी इच्छित स्थळी जावे. |
| ७. | **दिनकर जवळकर पथ ते पायगुडे चौक (जोशी आळी) हिराबाग चौक** | दिनकरराव जवळकर पथने सरळ बाजीराव रोड डावीकडे वळून टेलिफोन भवन त पूरम चौक, टिळक रोडने वाहन चालकांनी इच्छित स्थळी जावे. |
| ८. | **कै.अनंत बाळकृष्ण नाईक पथ (जगदीश गॅरेज उप-रस्ता) ते टिळक रोडकडे जाण्यास बंदी** | लहान रस्ता असल्याने पर्यायी मार्ग दिलेला नाही. (गल्ली आहे.) |
| ९. | **सणस रोड : गोटीराम भैय्या चौक ते गोविंद हलवाई चौक** | गोटीराम भैय्या चौक, गाडीखाना, सुभेदार तालीम, डावीकडे वळून कस्तुरे चौक, डावीकडे वळून गोविंद हलवाई चौक या रस्त्याचा वापर करावा. |
| १० | **पानघंटी चौक ते गंज पेठ चौकी** | पानघंटी चौक, जैन मंदीर चौक, फुलवाला चौक, कस्तूरे चौक, उजवीकडे वळून गंज पेठ चौकी मार्गे इच्छित स्थळी जावे. |
| ११ | **गंजपेठ चौकातुन वीर लहुजी वस्ताद तालीमकडे जाण्यास बंदी** | लहान रस्ता असल्याने पर्यायी मार्ग दिलेला नाही. (अरूंद आहे.) |
| १२ | **गावकसाब मशिद ते सेंट्रल स्ट्रीट चौकी** | **अ.** गावकसाब मशिद, बाबाजन चौक, सरबतवाला चौक, सेंट्रल स्ट्रीट चौकी,<br>**ब.** गावकसाब मशिद, सेंट्रल स्ट्रीट, इंदिरा गांधी चौक, डावीकडे वळून भगवान महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी जावे. |
| १३ | **कोहिनुर चौक ते बाबाजान चौक** | कोहिनुर चौक, भगवान महावीर चौक, डावीकडे वळून सरबतवाला चौक डावीकडे वळून बाबाजान चौक या पर्यायी मार्गाचा वापर करावा. |
| १४ | **जेधे प्रसाद रस्ता / सुभानशहा रस्ता, पार्श्वनाथ चौक (नाईक हॉस्पीटल) ते शास्त्री चौक, सुभान -शहा दर्गा ते सोन्या मारूती चौक** | पार्श्वनाथ चौक (नाईक हॉस्पीटल) डावीकडे वळून सुभेदार तालीम चौक, सरळ शिवाजी रोडने शिंदे आळीतून इच्छित स्थळी जावे. किंवा पार्श्वनाथ चौक, फुलवाला चौक, कस्तूरे चौक मार्गे इच्छित स्थळी जावे. |
| १५ | **गुरूनानक पथ हमजेखान चौक ते देवजीबाबा चौकाकडे जाणेसाठी वरील नमूद कालावधी व वेळे पुरता प्रवेश बंद मधून जाणेकरीता परवानगी देण्यात येत आहे.** | |
| १६ | **वरील बंद केलेल्या मार्गावर सदर मार्गास मिळणारे उप-रस्ते गल्ली मधून स्थानिक वाहतूक व्यतिरीक्त येण्यास मनाई करण्यात येत आहे.** | |
| १७ | **नो-पार्कींग बाबत-** **१) शिवाजीरोड-** जिजामाता चौक ते मंडई चौक<br>**२) मंडई ते शनिपार चौक**<br>**३) बाजीरावरोड-** शनिपार ते फुटकाबुरुड पर्यंत<br>**४) आप्पा बळवंत ते बुधवार चौक पर्यंत**<br>**(वरील मार्गावरील रस्त्याचे दोन्ही बाजुस नो- पार्कींग करण्यात आले आहे)** | |

**गणेशोत्सवाचे काळात दिनांक ११/०९/२०२४ ते १८/०९/२०२४ या दरम्यान सायंकाळी १७.०० ते गर्दी संपेपर्यंत कुमठेकर रस्ता, सदाशिवपेठ, फडके हौद रस्ता, सिंहगड गॅरेज ते म.न.पा. कार्यशाळा चौक (नाईक**

**रस्ता) व कोहिनुर हॉटेल ते भगवान महावीर चौक, (एम.जी.रोड) या मार्गावरील एकेरी वाहतूकीचे आदेश गरजेनुसार तात्पुरत्या स्वरुपात शिथील केले जातील.**

**पादचा-यांची गर्दी लक्षात घेऊन सायं. १७.०० नंतर आवश्यकतेप्रमाणे वाहतूकीस बंदी घालण्यात येईल अथवा वाहतुक पर्यायी मार्गाने वळविली जाईल. तरी नागरीकांनी बंदी घातलेल्या मार्गावरून वरील कालावधीत वाहने घेवून न जाता नमूद केलेल्या पर्यायी मार्गांचा किंवा अन्य मार्गांचा वापर करावा असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात येत आहे.**

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत**:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४ दिनांक :- / /२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी होणारे गणेश विसर्जन ठिकाणांजवळ करण्यात आलेली पार्कींग व्यवस्था**

पुणे शहरात दिनांक- ०७.०९.२०२४ ते १७.०९.२०२४ या कालावधीत मोठया प्रमाणात गणेशोत्सव साजरा होत आहे. सदर गणेशोत्सवाचे कालावधीत कित्येक भाविक त्यांचे धार्मिक परंपरेनुसार पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी गणेश विसर्जन करीत असतात.चालू वर्षी गणेश उत्सवात दिनांक २३.०९.२०२४ रोजी पाचवा दिवस, दिनांक-२५.०९.२०२४ रोजी सातवा दिवस व दिनांक २७.०९.२०२४ रोजी नववा दिवस येत असून सदर दिवशी प्रामुख्याने खालील ठिकाणी गणेश विसर्जन करण्यात येते.सदर ठिकाणी गणेश विसर्जनादरम्यान वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालावी याकरीता शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **दि. ११/०९/२०२४, दि. १३/०९/२०२४ व दि. १५/०९/२०२४ रोजी**खालीलप्रमाणे पार्कींग व्यवस्थे बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

**१. अप्सरा टॉकीज जवळील कॅनॉल (पंडीत जवाहरलाल नेहरू रस्ता)**

- **पार्किंग-**पंडीत नेहरू रस्त्यावर वाहने अप्सरा टॉकीजचे बाजूस पार्क करावीत.

**२. चिमाजी आप्पा पेशवे पथावरील सावरकर पुतळयाजवळील कॅनॉल (मित्रमंडळ चौक- सावरकर चौक दरम्यान),**

- **पार्किंग-** चिमाजी आप्पा पेशवे पथावर कॅनॉलचे पुढे मित्रमंडळ चौकापर्यत पाटील प्लाझाचे डावे बाजूस तसेच सावरकर पुतळा चौकापासून ते पेशवे पार्क या सिंहगड रोडवर सारसबागेचे बाजूस पार्क करावीत.

**३.संगमपूल घाट (आर.टी.ओ. जवळ मोतीलाल रस्त्यावर)**

- **पार्किंग-** संगम पुल येथील राजाबहादुर मिल रोडवर सी.आय.डी. कार्यालय ते आर.टी.ओ. चौक येथे दोन्ही बाजूस भिंतीस लागून पार्क करावीत. तसेच एस.एस.पी.एम.एस. ग्राऊंडचे बाजूसही वाहने पार्क करावीत.

**४.एस.एम.जोशी पुलाखाली (गरवारे कॉलेज मागे),**

- **पार्किंग -**एस.एम.जोशी पुलाजवळ गरवारे कॉलेजच्या मागील बाजूस व ठोसर बागे समोरील स्टेट बँक(वैकुंठ स्मशानभूमी रोड)

**५. बाबा भिडे पुल : दोन्ही बाजुस (डेक्कन पीएमपीएमएल बसस्टॉप जवळ).**

- **पार्किंग-** बाबा भिडे पूल दोन्ही बाजूस नदी पात्रातील मोकळी जागा.

तरी गणेश विसर्जन पाचव्या, सातव्या व नवव्या दिवशी विसर्जनाचे वेळी सोबत आणण्यात येणारी वाहने श्रींची मुर्ती वाहनांवरून उतरून घेतल्यानंतर तात्काळ सदर ठिकाणाहून वाहन हालवुन ते वाहतूकीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी रस्ता सोडून अन्यत्र हलवावे.

गणेशोत्सवात वाहतुक कोंडीची समस्या टाळण्यासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करून पुणे शहर वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे हि विनंती.

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत**:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी

२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर

**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/ /२०२४ दिनांक :- / /२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**गणेशोत्सव २०२४ कालावधीमध्ये तसेच गणेश विसर्जनाचे दिवशी उपलब्ध असणारे पार्किंगबाबत..**

सन २०२४ चा गणेशोत्सव दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीमध्ये साजरा होत असुन शहरात ठिकठिकाणी श्रींच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर मोठया प्रमाणात देखावे व रोषणाई करण्यात आलेली आहे. सदरची रोषणाई व देखावे पाहण्यासाठी शहरातील व शहराबाहेरील नागरीक मोठया प्रमाणात येतात. तसेच दिनांक १७/०९/२०२४ रोजी श्री. गणेश विसर्जनाची शहरातील मुख्य मिरवणूक सकाळी ०९.०० वा. सुमारास निघणार असल्याने नागरीक मोठया संख्येने मिरवणूक पाहण्यासाठी येत असतात. सदर कालावधीमध्ये नागरिकांच्या वाहनांकरीता मनपाकडील / खाजगी / शाळा व महाविद्यालयांचे पार्किंग / सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या पार्किंगबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | उपलब्ध पार्किंगचे ठिकाण | वाहने | अ.क्र | उपलब्ध पार्किंगचे ठिकाण | वाहने |
|---|---|---|---|---|---|
| १ | न्यु इंग्लिश स्कुल, रमणबाग | दुचाकी | १४ | गणेशमळा ते राजाराम पुल | दुचाकी |
| २ | शिवाजी आखाडा वाहनतळ | दुचाकी/ चारचाकी | १५ | निलायम टॉकीज | दुचाकी/ चारचाकी |
| ३ | देसाई कॉलेज | पोलीस पार्किंग | १६ | विमलाबाई गरवारे हायस्कुल | दुचाकी |
| ४ | हमालवाडा,पत्र्यामारुती चौकाजवळ | दुचाकी/ चारचाकी | १७ | आबासाहेब गरवारे कॉलेज | दुचाकी/ चारचाकी |
| ५ | गोगटे प्रशाला | दुचाकी | १८ | संजीवनी मेडीकल कॉलेज मैदान | दुचाकी/ चारचाकी |
| ६ | COEP मैदान | दुचाकी | १९ | आपटे प्रशाला | दुचाकी |
| ७ | एसपी कॉल्ेज | दुचाकी/ चारचाकी | २० | फर्ग्युसन कॉलेज | दुचाकी/ चारचाकी |
| ८ | पीएमपीएमएल मैदानपुरम चौकाजवळ | चारचाकी | २१ | जैन हॉस्टेल बीएमसीसी रोड मैदान | दुचाकी/ चारचाकी |
| ९ | पेशवे पार्क सारसबाग | दुचाकी | २२ | मराठवाडा कॉलेज | दुचाकी |
| १० | हरजीवन हॉस्पी.समोर सावरकर चौक | दुचाकी | २३ | पेशव पथ | दुचाकी |
| ११ | पाटील प्लाझा पार्किग | दुचाकी | २४ | रानडे पथ | दुचाकी/ चारचाकी |
| १२ | पर्वती ते दांडेकर पुल | दुचाकी | २५ | कॉग्रेस हाऊस रोड | दुचाकी |
| १३ | दांडेकर पुल ते गणेशमळा | दुचाकी | २६ | न्यु इंग्लिश स्कुल टिळक रोड | दुचाकी/ चारचाकी |

तरी गणेशोत्सव कालावधीत रोषणाई व देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना आपली वाहने नमुद पार्किंग ठिकाणी पार्क करुन पोलीसांना सहकार्य करावे ही विनंती.

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

<u>प्रत</u>:- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | पुणे शहर वाहतूक पोलिस PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/ /२०२४दिनांक :- //२०२४**

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**गणेश विसर्जन मिरवणूकीचे वेळी वाहतूकीसाठी बंद रोड, डायव्हर्शन पॉईंट रिंगरोड, नो-पार्कीगची ठिकाणे व पार्कीगची ठिकाणे बाबत**

पुणे शहरात दिनांक १७/०९/२०२४ रोजी श्री. गणेश विसर्जनाची मिरवणूक सकाळी ०९.०० वा. सुमारास निघणार असल्याने नागरीक मोठया संख्येने मिरवणूक पाहण्यासाठी एकत्र येत असतात. नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व सोयीसाठी तसेच गणेश विसर्जन मिरवणूक शांततेने, सुरळीत व सुरक्षित पार पडावी तसेच वाहतुक सुरक्षीत व सुरळीत रहावी याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका, गणेश विसर्जन मिरवणुकीतील रथइ.) खेरीज करुन मिरवणुक मार्गावरील व परिसरातील वाहतूकीत **वाहतूकीची परिस्थिती पाहून आवश्यकतेप्रमाणे** खालील प्रमाणे बदल करित आहे.

## १) वाहतूकीसाठी बंद रस्ते

| अ.नं. | रस्त्यांची नावे | वेळ |
|---|---|---|
| १. | **शिवाजी रोड :**<br>काकासाहेब गाडगीळ पुतळा जंक्शन ते जेधेचौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी ०७.०० ते दि.१८/०९/२०२४ रोजी मिरवणूक संपेपर्यंत (आवश्यकतेप्रमाणे) |
| २. | **लक्ष्मी रोड :**<br>संत कबीर चौकी ते अलका टॉकीज चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी ०७.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ३. | **बाजीराव रोड :**<br>बजाज पुतळा चौक ते फुटका बुरूज चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ४. | **कुमठेकर रोड :**<br>टिळक चौक ते चितळे कॉर्नर चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ५. | **गणेश रोड :**<br>दारूवाला पुल ते जिजामाता चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ६. | **केळकर रोड :**<br>बुधवार चौक ते अलका टॉकीज चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ७. | **टिळक रोड :**<br>जेधे चौक ते टिळक चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ८. | **शास्त्री रोड :**<br>सेनादत्त चौकी चौक ते अलका टॉकीज चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी दुपारी १२.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ९. | **जंगली महाराज रोड :**<br>झाशी राणी चौक ते खंडोजी बाबा चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| १०. | **कर्वे रस्ता :**<br>नळ स्टॉप चौक ते खंडोजी बाबा चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| ११. | **फर्ग्युसन रोड :**<br>खंडोजी बाबा चौक ते फर्ग्युसन कॉलेज मेनगेट | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |
| १२. | **भांडारकर रस्ता :**<br>पी.वाय.सी जिमखाना ते गुडलक चौक ते | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | नटराज चौक | |
| **१३.** | **पुणे सातारा रोड :-**<br>व्होल्गा चौक ते जेधे चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यत |
| **१४.** | **सोलापुर रोड :-**<br>सेव्हन लव्हज चौक ते जेधे चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यत |
| **१५.** | **प्रभात रोड :-**<br>डेक्कन पोस्टे ते शेलारमामा चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सायं. १६.०० ते दि. १८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यत |
| **१६.** | **बगाडे रोड :**<br>सोन्या मारूती चौक ते फडके हौद चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यत |
| **१७.** | **गुरू नानक रोड :**<br>देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक ते गोविंद हलवाई चौक | दिनांक-१७/०९/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते दि.१८/०९/२०२४रोजी मिरवणूक संपेपर्यत |

## २) डायव्हर्शन पॉईंट

१)**जंगली महाराज रोड** :- झाशी राणी चौक,
२)**शिवाजी रोड** :- काकासाहेब गाडगीळ पुतळा
३) **मुदलीयार रोड** :- अपोलो टॉकीज / दारुवाला पुल
४) **लक्ष्मी रोड** :- संत कबीर पोलीस चौकी
५) **सोलापूर रोड** :- सेव्हन लव्हज चौक
६) **सातारा रोड** :- व्होल्गा चौक
७) **बाजीराव रोड** :- सावरकर पुतळा चौक
८) **लाल बहादुर शास्त्री रोड** :- सेनादत्त पोलीस चौकी
९) **कर्वे रोड** :- नळस्टॉप
१०)**फर्ग्युसन कॉलेज रोड** :- गुडलक चौक

वरील ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे डायव्हर्शन करण्यात येईल. यासाठी दिवसपाळी व रात्रपाळी स्वतंत्र बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

## ३) रिंग रोड

**(वरील बंद रस्त्याकरीता पर्यायी मार्ग तयारकरण्यात आला असुन नमुद केलेल्या रिंग रोडचा वापर करावा. सोबत नकाशा )**

कर्वे रोड - नळस्टॉप चौक - लॉ कॉलेज रोड - **सेनापती बापट रोड** - सेनापती बापट रोड जंक्शन **- गणेशखिंड रोड** - सिमला ऑफिस चौक - संचेती हॉस्पीटल चौक -इंजि.कॉलेज चौक - **आंबेडकर रोडवरील** शाहिर अमर शेख चौक - मालधक्का चौक - बोल्हाई चौक **-** नरपतगिरी चौक –**नेहरु रोडवरुन** संतकबीर पोलीस चौकी - सेव्हन लव्हज चौक - वखार महामंडळ चौक **-शिवनेरी रोडवरुन** गुलटेकडी मार्केटयार्ड - मार्केटयार्ड जंक्शन - **सातारा रोडने** व्होल्गा चौक (लक्ष्मीनारायण सिनेमा)**-सिंहगड रोडने** मित्रमंडळ चौक - सावरकर चौक **-** सिंहगड रोड जंक्शन - **लाल बहादुर शास्त्री रोडने** सेनादत्त पोलीस चौकी, अनंत कान्हेरे पथावरुन म्हात्रे पुल ते नळस्टॉप

**टिप :-**
दिनांक १७/०९/२०२४ रोजी पासून ते गणपती विसर्जन मिरवणूक संपेपर्यत वर नमुद रस्त्यावरुन दुहेरी वाहतूक सुरु राहील.

## ४) नो-पार्किंग केलेले रस्ते

दिनांक १७/०९/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. पासून मुख्य मिरवणूक संपेपर्यंत पोलीस, अग्निशामक दल, रूग्णवाहिका व एम.एस.ई.बी. यांचे वाहनांखेरीज सर्व प्रकारच्या वाहनांना मुख्य मिरवणूक असणारे खालील रस्त्यांवर नो-पार्किंग करण्यात येत आहे.

१) **लक्ष्मी रोड** :- संत कबीर चौक ते अलका टॉकीज चौक
२) **केळकर रोड** :- बुधवार चौक ते अलका टॉकीज चौक
३) **कुमठेकर रोड** :- शनिपार चौक ते अलका टॉकीज चौक
४) **टिळक रोड** :- जेधे चौक ते अलका टॉकीज चौक
५) **बाजीराव रोड** :- पुरम चौक ते फुटका बुरुज चौक
६) **शिवाजी रोड** :- गाडगीळ पुतळा ते जेधे चौक
७) **शास्त्री रोड**:- सेनादत्त पोलीस चौकी ते अलका टॉकीज चौक
८) **जंगली महाराज रोड** :- झाशी राणी चौक ते खंडोजी बाबा चौक
९) **कर्वे रोड** :- नळस्टॉप ते खंडोजीबाबा चौक
१०) **फर्ग्युसन कॉलेज रोड** :- खंडोजी बाबा चौक ते गुडलक चौक

**खंडोजीबाबा चौक ते हॉटेल वैशाली यांना जोडणाऱ्या उपरस्त्यांचे १०० मीटर परिसरात पार्किंग करीता बंदी करण्यात येत आहे.** नमुद रस्त्यांवर असणारी पार्किंग व्यवस्था वरील कालावधीमध्ये स्थगित करण्यात येत आहे.

## ५) जड वाहनांस प्रवेश बंद

दिनांक१७/०९/२०२४ चे ००.०१ ते १८/०९/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत एकूण ४८ तास संपुर्ण शहरामध्ये सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात येत आहे.

## ६) गणेश विसर्जनादरम्यान धायरी फाटा, केशवनगर मुंढवा व ससाणे नगर,हडपसर परिसरातील वाहतूक बदल

❖ **धायरीफाटा चौक-नांदेड फाटा-उंबऱ्या गणपती चौक परिसरातील वाहतूक बदल**

- ❖ दि. **१७/०९/२०२४ रोजी सायंकाळी १८.०० ते रात्रौ २४.०० वा. पर्यंत** धायरी फाटा येथुन उंबऱ्या गणपती चौकाकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग**

- ✓ स्वारगेटकडून येणारी वाहतूक ही धायरी फाटा चौक, राजयोग सोसायटी चौक, नांदेड सिटी चौक, दळवीवाडी, धायरी, उंबऱ्या गणपती चौक

### ❖ छत्रपती शिवाजी महाराज चौक, केशवनगर, मुंढवा व ससाणे नगर,हडपसर परिसरातील वाहतूक बदल

**एकेरी मार्ग :- दि. १७/०९/२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते गणेश विसर्जन होईपर्यंत**

- ✓ छत्रपती शिवाजी महाराज चौक, केशवनगर येथून मांजरीकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी मांजरी रोडने न जाता रेणुका माता मंदीर उजवीकडे वळून मांजरी रोडकडे जावे.
- ✓ गायरान वस्ती येथून मुंढवा चौकाकडे येणाऱ्या वाहनचालकांनी रेणुका माता मंदिर येथून डावीकडे वळून पुढे व्यंकटेश ग्राफिक्स येथून उजवीकडे वळून मुंढवा चौकाकडे जावे.

- **ससाणेनगर, हडपसर परिसरातील वाहतूक बदल**

**दि. १६/०९/२०२४ व दि. १७/०९/२०२४ रोजी सकाळी ०६.०० ते २४.०० वा. आवश्यकतेनुसार**

**१) काळेपडळ अंडरपास येथून ससाणेनगर मेन रोडकडे येणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे.**

- ✓ **पर्यायी मार्ग** :- काळेपडळ अंडरपास, समृध्दी सोसायटी उजवीकडे वळून रवी पार्क रोडने हांडेवाडी रोड, डावीकडे वळून ससाणेनगर अंडरपास येथून इच्छितस्थळी

**२) कालेपडळकडून नवनाथ चौक गणपती मंदिराकडे येणारी तसेच डी.मार्ट मार्गे ससाणेनगर मेन रोडकडे येणारी वाहतूक बंद करण्यात आहे.**

✓ **पर्यायी मार्ग** :- कालेपडळ, तुकाई दर्शन, गोंधळेनगर, हडपसर गाडीतळ येथून इच्छितस्थळी

**३) न्यु इंग्लिश स्कुल डी.पी. रोड (ससाणेनगर अंडरपास) येथुन ससाणेनगर मेनरोडकडे येण्यास बंदी करण्यात येत आहे.**

✓ **पर्यायी मार्ग** :- ससाणेनगर अंडरपास सैय्यदनगर, हांडेवाडी रोड, रवी पार्क रोडने काळेपडळ अंडरपास येथुन इच्छितस्थळी किंवा ससाणेनगर अंडरपास, वैदुवाडी / रामटेकडी मार्गे इच्छितस्थळी

**४) हडपसर येथुन ससाणेनगर रोडने सय्यदनगरकडे जाणारी वाहतूक एस.बी.आय. बॅंकेशेजारील डी.मार्ट मार्गे काळेपडळकडे वळविण्यात येत आहे.**

तरी नागरिकांनी वरील प्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

**(अमोल झेंडे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

<u>प्रत</u>:-

**१.पोलीस निरीक्षक प्रेसरुम पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर**
२.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
३.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
४.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पुणे शहर पोलीस आयुक्तालय
पुणे